CNR No.MHST120012332018

नियमीत दिवाणी दावा नं. ३९३/२०१८ मधील नि.६१ वरील आदेश

सदरचा अर्ज हा वादी यांनी नि.क्र.३ (१) व ३(२) लगत अनुक्रमे नोटीसची स्थळप्रत व पोहोच पावती दाखल केली आहे. त्यास निशाणी देणेकामी दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार दाव्यातील नोटीसची स्थळप्रत व पोहोच पावती ही वादीने नि.क्र.२६ वरील प्रतिज्ञापत्रामध्ये शाबीत केली आहे. तसेच, मे.न्यायालयाने नि.क्र.३६ वरील आदेशान्वये दि.०५/०९/२०१८ रोजीचे करारपत्रास नि.क्र.३७ देण्याचा आदेश पारित केला आहे. तरी, त्या आदेशाप्रमाणे करारपत्रास निशाणी न दिल्याने त्यास निशाणी क्र.३७ देण्याची विनंती केली आहे. तसेच, नि.क्र.२५ लगत वादी तर्फे कुलमुखत्यारपत्र दाखल केले आहे. त्यास निशाणी देण्याची विनंती केली आहे. तसेच, प्रतिवादींनी दि.२८/०३/२०२४ रोजी नि.क्र.४४ अन्वये पुरावा संपल्याची पुरसीस दिली आहे. परंतु, प्रतिवादीने दि.११/७/२०२१ रोजी दिलेल्या अर्जावरती देखील नि.क्र.४४ दिलेली आहे. तरी, सदरच्या अर्जास निशाणी क्र.४४अ देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदरील अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, नि.क्र.३७ व ४४अ देण्यास त्यांची हरकत नाही असे कथन केले आहे. तथापि, प्रतिवादीच्या कथनानुसार नि.क्र.३(१)व ३(२) व नि.क्र.२५ लगतचे कागदपत्रास निशाणी देता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद व अभिलेखाचे अवलोकनावरुन असे निदर्शनास येते की वादीने दाखल केलेला सदरचा दावा हा करारपत्रावरुन खरेदीपत्र करुन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी तर्फे कुलमुखत्यार यांनी यादी नि.क्र.२५ लगत कुलमुखत्यारपत्र दाखल केलेले आहे व तद्नंतर नि.क्र.२६ वर वादी तर्फे कुलमुखत्यार यांनी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र वाचून जतन केले आहे. तद्नंतर प्रतिवादीच्या वकीलांनी वादी तर्फे कुलमुखत्यार याचा उलटतपास देखील नोंदविलेला आहे. सदरचे नि.क्र.२६ चे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर उलटतपास घेण्यापूर्वी प्रतिवादीचे वकीलांनी वादी तर्फे कुलमुखत्यार यास नि.क्र.३ सोबत दाखल केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने जबाब देता येणार नाही असा आक्षेप नोंदविलेला नाही. याउलट, प्रतिवादींनी वादी तर्फे कुलमुखत्यार यांचा उलटतपास घेवून दावा सद्यस्थितीत वादी व प्रतिवादी यांचा पुरावा संपून युक्तिवादासाठी तहकूब आहे. सबब, प्रतिवादींचा नि.क्र.३(१) व ३(२) व २५ लगतचे मुखत्यारपत्र यास निशाणी न देणेबाबतची हरकत मंजूर करता येणार नाही. मे.न्यायालयाच्या नि.क्र.३६ वरील आदेशानुसार दि.५/९/२०१८ रोजीच्या करारपत्रास नि.क्र.३७ देण्यात आलेली आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.६१ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी नि.क्र.०३ वरील कागदपत्राचे यादीसोबत अ.क्र.३(१) व ३(२) लगत दाखल केलेली नोटीसची स्थळप्रत व पोहोच पावती यास अनुक्रमे **निशाणी क्र.६२ व ६३** देणेत येत आहे व ती पुराव्याचे कामी वाचण्यात येत आहे.

३. वादी यांनी नि.क्र.२५ लगत दाखल केलेले मुखत्यारपत्र हे मुळ स्वरुपात असल्याने त्यास **निशाणी क्र.६४** देणेत येते.

४. प्रतिवादीने दि.११/७/२०२४ रोजी दिलेल्या पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यासाठीच्या अर्जास **निशाणी क्र.४४अ** देण्यात यावी.

*(खुल्या न्यायालयात न्यायसनावर घोषित करण्यात आला.)*

SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Digitally signed by SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Date: 2025.08.02 11:30:26 +0530

म्हसवड. **(श्रीमती.एस.एस.साळुंखे )**
दि.३१/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,म्हसवड.